**महाराष्ट्र शासन**

गृह विभाग
दुसरा मजला, मुख्य इमारत,मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
**दुरध्वनी व फॅक्स क्र.**०२२ २२०२४८६९ **E-mail id:** home_pol१३@maharashtra.gov.in

**क्रमांक :** 639358/H.D.-58020/6/2023-POL13-MHD-Home Department
**दिनांक :** ०८ ऑगस्ट, २०२४

प्रति,
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय :- ज्येष्ठ नागरिकांच्या धोरणाबाबत....**
**संदर्भ :- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक ज्येष्ठना-२०२४/प्र.क्र. २२६/सामाउ, दिनांक २९.०७.२०२४ रोजीचे पत्र.**

ज्येष्ठ नागरिकांच्या धोरणाबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दिनांक २९.०७.२०२४ रोजी सायंकाळी ०३.३० वाजता सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्याच्या उद्देशाने गृह विभागाशी संबंधीत बाबींबाबत सदर बैठकीमध्ये मा. मुख्यमंत्री महोदयांनी खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत :

१) शासन पत्र दिनांक १० जुलै, २०२३ व १७ नोव्हेंबर, २०२३ आणि पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक २३.०२.२०२४ रोजीचे परिपत्रकान्वये दिलेल्या निर्देशानुसार प्रत्येक पोलीस स्टेशन मध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या अध्यक्षतेखालील समिती आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेसाठी ज्येष्ठ नागरिक सहायता कक्ष स्थापन करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने प्रत्येक पोलीस स्टेशन मध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या अध्यक्षतेखालील समिती आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेसाठी ज्येष्ठ नागरिक सहायता कक्षाची तात्काळ स्थापना करण्यात यावी.

२) ज्येष्ठ नागरिकांशी संबंधीत गुन्हे/अपराधिक तक्रारींसंबंधी पोलीसांकडून तातडीने मदत मिळणेकरिता १५ दिवसांत २४ X ७ टोल फ्री हेल्पलाईन नंबर सुरू करण्याची कार्यवाही करावी.

३) उपरोक्त मुद्दा क्रमांक (१) व (२) बाबत प्रसिद्धी देण्याची कार्यवाही करावी.

२. उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास दिनांक ०९.०८.२०२४ पर्यंत सादर करावा, ही विनंती.

Signed by
Hemantkumar K Mohan
Date: 08-08-2024 12:10:10

(हेमंतकुमार कि. मोहन)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

श्री. अण्णासाहेब टेकाळे, उपाध्यक्ष, अखिल भारतीय वरिष्ठ नागरिक महासंघ.